ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ • पुणें, बुधवार तारीख २७ मे, १९५३ अंक २१

## विविध माहिती

**युनायटेड कमर्शिअल बँकेची शाखा**—युनायटेड कमर्शिअल बँकेनें गेल्या १८ तारखेपासून लंडन येथें आपली शाखा सुरू केली. शाखा उघडण्यासाठीं बँकेचे जनरल मॅनेजर श्री. बी. टी. ठाकूर लंडनला गेले होते. ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर व हाँगकाँग येथेंहि बँकेच्या शाखा आहेत.

**अविवाहित स्त्रीनोकरांची सोय**—सैयद्पेठ जिल्ह्यांतील तोडहंटर नगर येथें नौकरींतील अविवाहित स्त्रियांसाठीं एक होस्टेल बांधण्याचा मद्रास सरकार विचार करीत आहे. इमारतीला १॥ लाख रुपये खर्च येणार असून तींत ५० स्त्रियांची सोय करण्यांत येईल. प्रत्येक नोकराला १२ फूट लांब व ८ फूट रुंद अशी खोली देण्यांत येईल. स्वयंपाकघर मात्र समाईक राहील.

**मध्य प्रदेशांत पोलादाचा कारखाना**—मध्य प्रदेशांत पोलादाचा एक कारखाना काढण्याचा भारत सरकारचा विचार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं एका जर्मन कंपनीचें साह्य घेण्याचे प्रयत्न सरकारनें चालविले असल्याची माहिती मध्य प्रदेशाचे उद्योगमंत्री श्री. मेहता ह्यांनीं सांगितली.

**राजकीय पेन्शनचा भार**—भारताचे गृहमंत्री डॉ. काटजू ह्यांनीं सभागृहांत अशी माहिती सांगितली कीं राजकीय पेन्शनसाठीं म्हणून भारतीय सरकारला दरवर्षी २३,२०,६०० रुपये द्यावे लागतात. बोहऱ्यांचे पुढारी आगाखान ह्यांना ब्रिटिश सरकारला त्यांनीं केलेल्या मदतीदाखल १२,००० रुपये द्यावे लागतात.

**रशिआचें कापसाचें उत्पादन**—रशिआचें कापसाचें उत्पादन इजिप्त, इराण, तुर्कस्थान, अफगाणिस्थान आणि भारत ह्या देशांच्या उत्पादनाइतकें आहे, असें समजतें. मध्य आशिआंतील कांहीं सामुदायिक शेतें दर हेक्टरमध्यें ३ ते ४ टन कापूस पिकवितात अशीहि माहिती जाहीर करण्यांत आली आहे.

**भारताचें मिठाचें उत्पादन**—१९५१ मध्यें भारतामधील मिठागरांत ७,४३,७६,००० मण मीठ तयार करण्यांत आलें होतें. १९५२ सालीं उत्पादनांत वाढ झाली असून तें ८,०४,९८,००० मण इतकें झालें, असें समजतें.

**टेलिफोन्सची निर्यात करणार**—बंगलोर येथील टेलिफोनच्या कारखान्यांत आतां दरवर्षी ४०,००० टेलिफोन्स तयार होऊं लागले आहेत. पुढील वर्षापासून ६०,००० टेलिफोन्स तयार होतील. भारताच्या गरजा भागून अधिक उत्पादन होऊं लागल्यानें सीलोन आणि ब्रह्मदेश ह्या देशांकडे टेलिफोन्स निर्यात करण्याचा विचार चालू आहे, असें समजतें.

**समृद्धतेमुळें उत्पन्न झालेला पेंच**—अमेरिकन सरकारपुढें १०० कोटी डॉलर्स किंमतीच्या लोण्याचें, खव्याचें आणि दुधाच्या भुकटीचें काय करावें असा प्रश्न उत्पन्न झाला आहे. शेतकऱ्यांना चढ्या किंमती मिळाव्या म्हणून अमेरिकेच्या शेतकी खात्याला जरूरीपेक्षा अधिक असलेलें उत्पादन बाजारांत येऊं न देतां स्वतः विकत घ्यावें लागतें. वरील जिनसांशिवाय मध, वाटाणे आणि ऑलिव्ह-तेल ह्यांनींहि सरकारी गुदामें भरून गेलीं आहेत.

**चीनचें तेल अमेरिकेनें विकत घेतलें**—'विस्मा' ह्या नांवाचें एक फिनलंडचें जहाज जेट विमानांना लागणारें पेट्रोल घेऊन चीनला जात होतें. सिंगापूर येथें पोहोंचल्यावर बोटीवरील १०,००० टन तेल अमेरिकेनें विकत घेतलें आणि तें एका अमेरिकन बोटीवर चढविण्याची व्यवस्था केली.

**प्राचीन तळ्याची दुरुस्ती**—भोपाळ जवळ सोनेरा-सांढारा ह्या नांवाचें एक प्राचीन तळें असून तें राजा भोज ह्यानें बांधल्याची आख्यायिका आहे. ह्या तळ्याची दुरुस्ती करण्यासाठीं २ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. तळ्याच्या पाण्यानें १,००० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं शकेल.

**ईश्वरभक्तीची लक्ष्मीवर मात**—अहमदाबाद येथील गिरणींत काम करणाऱ्या एका कामगारानें मोठ्या कष्टानें १,५०० रुपये शिल्लक टाकले होते. परंतु परवा त्यानें ह्या सर्व नोटा देवीला अर्पण करून जाळून टाकल्या आणि त्यांची राख अंगाला फासली. हा कामगार वेडा नाहीं, अगर दारू पिणाराहि नाहीं.

**सिलोन रेडिओवरील वेळासाठीं खर्च**—रेडिओ सिलोनवरील वेळ भारतामधील कांहीं कंपन्या जाहिरातीसाठीं भाड्यानें घेतात. अशा कंपन्यांनीं १९५१ सालीं सिलोनला २,५२,००० रुपये पाठविले. त्याच वर्षी भारतामधील विदेशी कंपन्यांनीं जाहिरातीसाठीं सिलोनला २,६७,००० रुपये रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनें पाठविले.

**इफेल टॉवरला रंगसफेती**—फ्रान्समधील सुप्रसिद्ध इफेल टॉवरला दर सात वर्षांनीं रंगसफेती करण्यांत येते. पण ह्या खेपेस रंगसंगतींत फरक करण्यांत आला आहे. अगदीं वरच्या भागाला फिका तपकिरी रंग देण्यांत आला असून त्याखालील दोन भागांना अधिकाधिक गडद रंग देण्यांत आला आहे. टॉवरच्या वरच्या भागांतील रंग हवेमुळें हळुहळु गडद होत जातो, असें आढळून आलें आहे.

### खत विकत घेण्यासाठी राज्य–सरकारांना कर्जें

शेतकऱ्यांनीं अमोनिअम सल्फेट विकत घ्यावें म्हणून भारतीय सरकारनें राज्य–सरकारांच्या मार्फत त्यांना कर्जें देण्याची व्यवस्था केली आहे, असें समजतें. ह्या योजनेमुळें चालू वर्षी शेतकऱ्यांकडून खताचा अधिक उपयोग केला जाण्याची शक्यता आहे. राज्य–सरकारांना जें खत पुरविण्यांत येईल तें त्यांना विकत घेतां यावें म्हणून भारतीय सरकारनें २,८९,६०,५०० रुपयांचीं कर्जें देण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेंतून दहा राज्य–सरकारांना अल्प मुदतीचीं कर्जें देण्यांत आलीं आहेत. राज्य–सरकारें आपल्या राज्यांतील शेतकऱ्यांना त्यांची पत पाहून अमोनियम सल्फेटसारखीं खतें देणार आहे. निरनिराळया राज्यांना मिळालेल्या रकमांचे आकडे पुढीलप्रमाणें आहेत. प. बंगाल ७२,६०,५५० रुपये; उत्तर प्रदेश ६०,४५,००० रुपये; मध्यप्रदेश ३१,९०,००० रुपये; बिहार ३१,८१,५०० रुपये; हैद्राबाद २७,८८,७०० रुपये; राजस्थान १७,८८,९०० रुपये; म्हैसूर १६,७५,००० रुपये; पंजाब ११,०५,००० रुपये; आसाम ७,९७,५०० रुपये; पेप्सु ६,७५,५०० आणि मध्य भारत ४,५२,८०० रुपये. राज्य–सरकारांना मिळून २,१५,७३० टन अमोनियम सल्फेट वांटण्यांत आलें आहे. ही वाटणी पुढील-प्रमाणें आहे. प. बंगाल ५०,००० टन; उत्तर प्रदेश ४०,००० टन; बिहार २६,००० टन; हैद्राबाद २५,००० टन; पंजाब, राजस्थान आणि मध्यप्रदेश प्रत्येकीं २०,००० टन; म्हैसूर ५,५०० टन; पेप्सू ५,००० टन; आसाम २,५०० टन आणि मध्यभारत १,७३० टन. सिंद्री येथील खताच्या कारखान्यांत तयार झालेलें खत खपण्याच्या कामीं अडचणी उत्पन्न झाल्यामुळें बरेंचसें खत पडून होतें अशा वार्ता मध्यंतरीं आल्या होत्या. खतें विकत घेण्यासाठी कर्जें देण्याची व्यवस्था झाल्यामुळें त्यांचा उठाव होणें सुलभ होईल.

### पोस्टल सेव्हिंग्ज बँकेच्या नव्या सवलती

पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकेंत पैसे ठेवणाऱ्यांना कांहीं नव्या सवलती देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. प्रथम ह्या सवलती मुंबई विभागांतील कांहीं निवडक पोस्ट ऑफिसांतून अंमलांत आणल्या जातील. नव्या सवलतीप्रमाणें बँकेंतून चेकनें पैसे काढण्याची आणि भरणा करतांना चेक व ड्राफ्ट ह्यांचा उपयोग करण्याची सोय होईल. एका आठवड्यांत एका सेव्हिंग्ज खात्यांतुन दोनदा पैसे काढतां येतील आणि जास्तींत जास्त १,००० रुपये काढतां येतील. पैसे काढणाऱ्याची चेकवरील सही आणि बँकेंतील नमुन्याची सही ह्यांत तफावत दिसून आली तर सहीच्या खरेपणाविषयीं एखाद्या गॅझेटेड ऑफिसरच्या अगर दुसऱ्या एखाद्या खातेदाराच्या सहीची हमी घेण्यांत येईल. पैसे काढण्याच्या वेळीं अगर ते भरण्याच्या वेळीं कलकत्ता, कानपूर आणि अलाहाबाद येथील मुख्य पोस्ट ऑफिसांतून बिले देण्याची व्यवस्था केली जाईल. ह्या व्यवस्थेमुळें पोस्ट ऑफिसमध्यें लोकांच्या लांबच लांब रांगा लागण्याचें कमी होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. सेव्हिंग्ज बँकेंत दोघांच्या नांवावर रक्कम असेल तर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज देण्यांत येईल. व्याजाचा हा दर २०,००० रुपयांपर्यंतच्या रकमेला लागू आहे. वीस हजार रुपयापेक्षा अधिक रक्कम असेल तर जितकी जास्त रक्कम असेल तांवर १॥ टक्का व्याज देण्यांत येईल. मात्र हा दर जास्तींत जास्त ३०,००० रुपये रक्कम असेल तेथपर्यंतच देण्यांत येईल. पोस्ट ऑफिसनें दिलेल्या ह्या सवलतीचा लोक कसा काय उपयोग करून घेतात ह्यावर पुढील धोरण अवलंबून राहील, हें उघडच आहे.


स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६३,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



दि

युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोयंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २७ मे, १९५३



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## पांच मोठ्या बँकांचे तुलनात्मक आकडे

'भारतांतील पांच प्रमुख बँका म्हणजे इंपीरिअल बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, युनायटेट कमर्शिअल बँक व बँक ऑफ बरोडा, ह्या होत. त्या सर्वांच्या १९५१ अखेरच्या ताळेबंदांचा तुलनात्मक विचार करणें मोठं उद्बोधक होईल. पंजाब नॅशनल बँकेचा येथें विचार केलेला नाहीं. ठेवीमध्यें घट होण्याचा अनुभव सर्वांनाच आलेला दिसतो, पण त्याहिपेक्षा बँकांनीं दिलेल्या कर्जांतील घट सार्वत्रिक आढळते. बँकांकडील ठेवींवरील व्याज वाढलें, कर्जें कमी झालीं तरी पांचाहि बँका डिव्हिडंडंचा दर कायम राखूं शकल्या. हिंदी बँकांना किंमती घटल्यामुळें जो अनुभव आला, त्यामानानें ह्याच क्षेत्रांत काम करणाऱ्या एक्सचेंज बँकांचा अनुभव अधिक चांगला आहे. मर्कंटाईल बँक ऑफ इंडिया आणि चार्टर्ड बँक ह्या दोघांनींहि डिव्हिडंडचा दर वाढविला आहे. मर्कंटाईल बँकेनें १२% चें १४% डिव्हिडंड केलें असून चार्टर्ड बँकेनें १४% डिव्हिडंडला २% बोनसची जोड दिली आहे.

कोरिअन युद्धामुळें निर्माण झालेल्या तेजींत एकदम खंड पडल्यामुळें पूर्वेकडील देशांत व्यापार-उदीमास व त्यामुळें बँकांस जरा अडचणीचे दिवस आले; तो काळ संपून नवी संपत्ति आतां निर्माण होऊं लागली आहे. सहाजिकच, ह्यापुढील काळ ज्यास्त आशादायक आणि म्हणून बँकांना किफायतशीर होईल, ह्या अपेक्षेचें तें प्रतिबिंब आहे. बँकांचें डिव्हिडंड वाढवितांना, तें टिकवितां येईल किंवा नाहीं ह्याकडे लक्ष द्यावें लागतें. डिव्हिडंड-मध्यें चढउतार करणें बँकांचे बाबतींत अपवादात्मकच असतें. ह्या दृष्टीनें पहातां, पूर्व आशिया व भारत ह्यांत व्यवहार करणाऱ्या उपरिनिर्दिष्ट ब्रिटिश बँकांनीं डिव्हिडंडचा दर वाढविला, ही गोष्ट सूचक आहे. भारतांतील बड्या पांच बँकांना भविष्यकाल तितका उत्साहकारक वाटत नसावा; कारण पैशाची टंचाई, बँक-रेटमध्यें वाढ, स्थानिक व लंडन येथील दरांत वाढती तफावत आणि भारतांतच उभारलेल्या पैशांतून शक्य तों येथें पैसे गुंतविण्याचा एक्सचेंज बँकांचा नेकीचा प्रयत्न, ह्या सर्वांमुळें ठेवींवरील व्याजाचे दर वाढले आणि सहाजिकच खेळत्या भांडवलासाठी बँकांना जास्त किंमत द्यावी लागली. मालाच्या किंमतीमधील उतारामुळें (४३३ वरून ३७३), तितक्याच मालासाठी कमी कर्ज पुरें पडूं लागलें आणि किंमती आणखी घटतील या भीतीनें कर्जमागणी कमीच राहिली. त्यामुळें, कर्जांत व बिल्सच्या व्यवहारांत बरीच घट झाली.

बड्या पांच बँकांपैकीं सर्वच बँकांची कर्जांतील गुंतवणूक उतरली. सर्वांचाच एस्टॅब्लिशमेंट खर्च वाढला आहे आणि ठेवींवर ज्यास्त व्याज द्यावें लागत आहे. त्यामुळें व्याज व डिस्कौंट ह्यांचें उत्पन्न वाढवूनहि इंपीरिअल खेरीज इतर बँकांच्या निव्वळ नफ्यांत घटच झालेली आहे. सर्व बँकांनीं डिव्हिडंडचा दर कायम राखला आहे.

## हप्तेबंदीनें कंपन्यांचे शेअर्स विकत मिळण्याची सोय

हप्तेबंदीनें जिनसांची खरेदी करण्याची पद्धत अमेरिकेंत खूपच प्रसार पावली आहे. त्यामुळें लक्षावधि लोकांना जीवनावश्यक गोष्टी त्याचप्रमाणें चैनीच्या वस्तू घेणें सोईचें झालें आहे. अमेरिकेंतील, कंपन्यांचे शेअर्सहि ह्या पद्धतीनें लोकांना कसे घेतां येतील, ह्याचा विचार न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजचे अधिकारी करीत आहेत. लहान प्रमाणावर पैसे बचत करूं शकणारांना शेअर्समध्यें पैसे गुंतवून अमेरिकेंतील प्रचंड कंपन्यांच्या नफ्यांत भागीदारी करता येईल, अशी कांहींतरी योजना आखण्यांत येत आहे. शेअर्सचे मालक होण्याची संधि शक्य तेवढ्या अधिक नागरिकांना देऊन त्यांना अमेरिकेच्या आर्थिक संसाराचे घटक बनविण्याचा त्यांत हेतु आहे. येत्या तीन वर्षांत वैयक्तिक शेअरहोल्डर्सची संख्या १५,००,००० नें वाढविण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे. ४७,००,००० कुटुंबांतील ६४,९०,००० व्यक्ति कोठल्याना कोठल्यातरी कंपनीचे आज भागीदार आहेत. प्रचाराच्या सहाय्यानें ह्या व्यक्तींची संख्या झपाट्यानें वाढविण्याचा प्रयत्न न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंज करणार आहे.

---

## टाटा डिफर्डचें रूपांतर: श्री. सेटलवाड ह्यांची सूचना

टाटा डिफर्डचे ऑर्डिनरीमध्यें रूपांतर करतांना ते कोणत्या प्रमाणांत करावें, ह्यासंबंधीं श्री. सेटलवाड ह्यांचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. १:६ असें प्रमाण त्यांनीं सुचविलें आहे, तें मान्य झाल्यास एकूण ऑर्डिनरी भागांची संख्या ६,४२,५०० होईल. सध्याच्याच दरानें डिव्हिडंड वाटलें, तर कन्व्हर्शननंतर ऑर्डिनरी शेअरवर २० रु. ३ आ. आणि डिफर्डवर १२१ रु. २ आ. असें डिव्हिडंड पडेल. १९५१-५२ चा दर २१ रु. व ११५ रु. ३ आ. असा होता.. डिफर्ड शेअरहोल्डर्सच्या कमिटीच्या मतें प्रत्येक डिफर्डची किंमत किमान ११ ऑर्डिनरी इतकी होती; ह्या उलट ऑर्डिनरी शेअरहोल्डर्सच्या कमिटीच्या मतें डिफर्डची किंमत ५ ऑर्डिनरीपेक्षा अधिक नाहीं. कंपनीच्या विनंतीस अनुसरून, भारत सरकारचे अटर्नी जनरल श्री. एम्. सी. सेटलवाड ह्यांनीं रूपांतराचें योग्य प्रमाण ठरवून दिलें आहे. टाटांच्या सल्लागार कंपनीचें मूल्यमापन तज्ज्ञ मि. मार्टिन ह्यांनीं श्री सेटलवाड ह्यांना आपला अहवाल फेब्रुवारी, १९५२ मध्यें सादर केला होता. त्यांच्या मतें, कंपनीची आजची मालमत्ता आजच्याच स्थितींत पुनः उभी करण्यास ४१·७६ कोटी रु. लागतील. श्री. सेटलवाड ह्यांचा अहवाल कोणावरच कायद्यानें बंधनकारक नाहीं, परंतु त्यांच्यावर कंपनीच्या भागीदारांचा विश्वास असल्यानें त्यांची भूमिका तडजोड करणाऱ्या सल्लागाराची आहे.

---

## जागतिक औद्योगिक उत्पादन

जागतिक औद्योगिक उत्पादन १९५१ मध्यें १९२९ च्या मानानें दुप्पट, १९३२ च्या मानानें तिप्पट व १९३७ च्या मानानें ७५% ज्यास्त झालें.

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

*Balance Sheet as at 31st December, 1952*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 1,00,000 Shares of Rs. 50 each ... | | 50,00,000—0—0 |
| **Issued & Subscribed Capital** | | |
| 64,000 Shares of Rs. 50/- each ... | | 32,00,000—0—0 |
| **Called and Paid-up Capital** | | |
| 64,000 Shares of Rs. 50/- each | | |
| Rs. 25/-per share called and paid up ... | | 16,00,000—0—0 |
| **Calls in Advance** | | 150—0—0 |
| **2. Reserve Fund & Other Reserves** | | |
| As per last Balance Sheet ... | 5,17,000—0—0 | |
| Additions during the year ... | 48,000—0—0 | 5,65,000—0—0 |
| **3. Deposits & Other Accounts** | | |
| Fixed Deposits ... | 77,36,282–15—6 | |
| Savings Bank Deposits ... | 1,21,72,437—1—7 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | 82,53,891—4—4 | 2,81,62,611—5—5 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| (i) In India ... | Nil | |
| (ii) Outside India ... | Nil | Nil |
| **Particulars:** | | |
| (i) Secured ... | Nil | |
| (ii) Unsecured ... | Nil | Nil |
| **5. Bills Payable** | | 2,31,030–11—9 |
| **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 11,87,316-15-11 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | 11,87,316-15-11 |
| **7. Other Liabilities** | | |
| Unpaid Dividend ... | 10,083—9-11 | |
| Rebate on Bills Discounted ... | 3,071—8—0 | |
| Branch Adjustments ... | 2,52,430—1—0 | 2,65,585—2-11 |
| **8. Acceptances, Endorsements & Other Obligations per Contra** | | 1,89,400—0—0 |
| **9. Profit and Loss** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 2,92,849-10-11 | |
| Less Appropriations :— | | |
| Reserve Fund Rs. 48,000-0-0 | | |
| Provision for Income-tax and Super-tax Rs. 1,10,000-0-0 | | |
| Dividend Rs. 80,000-0-0 | 2,38,000—0—0 | |
| | 54,849-10-11 | |
| Add—Profit for the year (Subject to taxation) brought from the Profit and Loss Account ... | 2,54,520—3-11 | 3,09,369-14-10 |
| **10. Contingent Liabilities** | | |
| On partly paid shares in Joint Stock Companies held by the Bank as Investments, including the shares of the Subsidiary Company ... | 1,38,595—0—0 | |
| Total Rs. ... | | 3,25,10,464—2-10 |

( See Profit and Loss Account on Page 178 )

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

***Balance Sheet as at 31st December, 1952***

## PROPERTY AND ASSETS

| Particulars | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Cash** | | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank ... | | | |
| (Including Foreign Currency Notes) ... | | | 33,64,497—3—2 |
| **2. Balances with Other Banks (in current account)** | | | |
| (i) In India ... | | 3,86,124-12-11 | |
| (ii) Outside India ... | | Nil | 3,86,124-12-11 |
| **3. Money At Call And Short Notice** | | | Nil |
| **4. Investments at Cost** | | | |
| (i) Securities of the Central & State Governments & Other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. (Out of these, Securities of the face value of Rs. 55,76,000/- are with Banks for over-draft arrangements) | | | |
| (Market value Rs. 1,09,66,637-13-0) | | | |
| (Face value Rs. 1,17,24,100-0-0) ... | | 1,15,70,017—0-10 | |
| (ii) Shares: | | | |
| Ordinary Shares (fully paid-up) | | | |
| (Market value Rs. 1,00,612-2-0) | Rs. 1,00,311-12—3 | | |
| Preference shares (fully paid-up) | | | |
| (Market value Rs. 3,47,869-12-0) | Rs. 4,01,963—8—6 | | |
| Ordinary shares (partly paid-up) | | | |
| (Market value Rs. 51,275-2-0) | Rs. 51,360—8—0 | 5,53,635-12—9 | |
| (iii) Debentures or Bonds (Market value Rs 13,930/-) ... | | 14,000—0—0 | |
| (iv) Other Investments: | | | |
| Stock for £200 @ cost Rs. 8,200 | Rs. 8,200—0—0 | | |
| Less received towards repayment of Capital | Rs. 5,979—3-10 | 2,220-12—2 | |
| (v) Gold ... | | Nil | 1,21,39,873—9—9 |
| **5. Advances** | | | |
| (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors): | | | |
| (1) Loans, Cash Credits, Over-drafts, etc. | | | |
| (i) In India | Rs. 1,36,80,105—4—3 | | |
| (ii) Outside India | Nil | 1,36,80,105—4—3 | |
| (2) Bills Discounted & Purchased (excluding Treasury Bills of the Central & State Governments) | | | |
| (i) Payable in India | Rs. 4,26,335—4—3 | | |
| (ii) Payable outside India | Nil | 4,26,335—4—3 | 1,41,06,440—8—6 |
| **Particulars of Advances (*See Page 178*)** | | | |
| **6. Bills Receivable, Being Bills for Collection as per Contra** | | | |
| (i) Payable in India ... | | 11,87,316-15-11 | |
| (ii) Payable outside India ... | | Nil | 11,87,316-15-11 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endrosements and Other Obligations per Contra** | | | 1,89,400—0—0 |
| **8. Fixed Capital Expenditure** | | | |
| (1) Land and Building At cost as at 31-12-1951 | Rs. 2,30,199-15—6 | | |
| Add building construction cost to date | Rs. 2,10,102—0—9 | | |
| | Rs. 4,40,302—0—3 | | |
| Less Depreciation to date | Rs. 10,199-15—6 | 4,30,102—0—9 | |
| (2) Safe Deposit Vault at Cost | | | |
| As per Last Balance Sheet | Rs. 1,69,371—2—3 | | |
| Additions during the year | Rs. 86-15—6 | | |
| | Rs. 1,69,458—1—9 | | |
| Less Depreciation to date | Rs. 8,726-15—6 | 1,60,731—2—3 | 5,90,833—3—0 |
| **9. Furniture And Fixtures At Cost** | | | |
| As per last Balance Sheet ... | | 1,30,638—7-10 | |
| Additions during the year ... | | 17,371—7—3 | |
| | | 1,48,009-15—1 | |
| Less Depreciation to date ... | | 39,883-13—0 | 1,08,126—2—1 |
| **10. Other Assets Including Silver** | | | |
| Stamps on hand ... | | 1,516—7—6 | |
| Tax paid in advance and at source ... | | 97,322—5—8 | |
| Interest accrued on Investments ... | | 59,340-11—0 | |
| Sundry advances ... | | 71,351-13—4 | |
| Advances to Building Contractors ... | | 87,320—6—0 | |
| Shares of the Executor and Trustee Co. (Partly paid-up) | | 1,21,000—0—0 | 4,37,851-11—6 |
| **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** | | Nil | Nil |
| Total Rs. ... | | | 3,25,10,464—2-10 |

(See Profit and Loss Account on Page 178)

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1952 on page 177**

| Particulars of Advances: | Rs. As. Ps. |
|---|---|
| (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 1,07,94,598-10-11 |
| (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 6,95,872-12-3 |
| (3) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors ... | 26,15,969-1-4 |
| (4) Debts considered doubtful or bad, not provided for. ... | Nil |
| | 1,41,06,440-8-6 |
| (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person ... | 5,23,422-15-3 |
| (6) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors Partners or Managing Agents or in the case of private companies, as members ... | 16,51,274-8-8 |
| (7) Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 5,33,800-10-11 |
| (8) Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private Companies as Members ... | 17,19,648-0-7 |
| (9) Due from Banking Companies ... | 2,14,915-9-9 |

## *Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1952*

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | INCOME | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on deposits, borrowings etc. ... | 4,22,850-15-11 | (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary provisions) ... | |
| 2. Salaries and allowances and Provident Fund: Manager 13,500-0-0; Others 3,62,673-12-8 | 3,76,173-12-8 | 1. Interest and Discount ... | 11,12,103-6-10 |
| | | 2. Commission, exchange and brokerage | 1,06,763-5-2 |
| | | 3. Rent (Less taxes and other charges) | 1,310-15-6 |
| 3. Directors' & Local Committee Members' fees and allowances ... | 9,072-8-0 | 4. Net profit on sale of Investments, gold and silver, land and premises and other assets (not credited to Reserves or any particular fund or account) ... | Nil |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. | 39,004-0-6 | | |
| 5. Law Charges ... | 14,150-5-6 | | |
| 6. Postage, Telegrams, Stamps & Telephone ... | 23,004-2-3 | 5. Net profit on revaluation of Investments, gold and silver, land premises and other assets (Not credited to Reserves or any particular fund or account) ... | Nil |
| 7. Auditors' Fees ... | 2,500-0-0 | | |
| 8. Depreciation on and repairs to the Banking Company's Property ... | 13,052-0-11 | | |
| 9. Stationery, Printing, Advertisement etc. ... | 41,485-6-6 | 6. Income from Non-Banking assets & profit from sale of or dealing with such assets ... | Nil |
| 10. Loss from sale of or dealing with non-banking assets. ... | Nil | | |
| 11. Other Expenditure: ... Sundry Charges 20,117-14-4; Travelling & Conveyance 9,482-7-0 | 29,600-5-4 | 7. Other receipts ... Transfer Fees 751-6-0; Lockers rental 4,484-12-0 | 5,236-2-0 |
| 12. Balance of Profit (Subject to Taxation) carried to Balance Sheet ... | 2,54,520-3-11 | | |
| Total Rs. ... | 12,25,413-13-6 | Total Rs. ... | 12,25,413-13-6 |

**Statement pursuant to Section 132-A of the Indian Companies Act of 1913 as amended by Act XXII of 1936.**

The Profit of The Subsidiary Company viz. The Maharashtra Executor and Trustee Company Limited for the year ended 31st December 1952 has been carried forward into the accounts of that Company.

G. L. Halbe, *Accountant.* C. V. Joag, *Manager.* D. K. Sathe, *Chairman.*

POONA CITY,
25th January, 1953.

N. G. Pawar, S. G. Marathe, M. V. Shah, B. M. Gupte, F. D. Pudumjee, M. R. Joshi, S. L. Kirloskar } *Directors*

### REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra Ltd. as at 31st December, 1952 and also the above Profit & Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the audited accounts of Bombay, Girgaon, Sholapur and Nagpur Branches and certified returns of other Branches and report that:

(*a*) We have obtained all the information and explanations we have required; (*b*) In our opinion the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law; (*c*) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the State of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the Books of the Bank; and (*d*) in our opinion, Books of Account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act.

We have to report further that: (*e*) The information and explanations required by us have been found to be satisfactory; (*f*) The transactions of the Bank which have come to our notice, in our opinion, have been within the powers of the Bank; (*g*) The returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit; (*h*) The Profit and Loss Account, in our opinion, shows a true balance of profit for the period covered by such account.

Poona City,
25th January, 1953.

G. D. APTE, B. A., G. D. A. F. C. A.
*Chartered Accountant, Poona 2.*

KULKARNI and KHANOLKAR,
*Chartered Accountants, Bombay.*

(See Balance Sheet on Page 176 and 177)

## पंचवार्षिक योजनेची प्रगति

### १९५१–५३ चा प्राथमिक स्वरूपाचा अहवाल

पंचवार्षिक योजनेतील बऱ्याच योजना लांब मुदतीच्या असल्यामुळें दोन वर्षांतील साध्य झालेल्या गोष्टींवरून विकासाची संपूर्ण कल्पना येणार नाहीं. ही गोष्ट शेतकीविषयक आणि विशेषतः विविधोपयोगी पाटबंधाऱ्यांच्या व वीज–योजनांच्या बाबतींत लागू आहे. तसेंच या दोन वर्षांत जागतिक अर्थव्यवहारांत दोन परस्परविरुद्ध प्रवृत्ति आढळून आल्या. कोरियन युद्धामुळें आलेल्या तेजीचे पाठोपाठ भावांत मंदी दिसून आली. या बदलत्या परिस्थितीशीं जुळतें घेण्यासाठी अंतर्गत व्यवहारांतहि जुळवाजुळव करावी लागली. खुल्या तसेंच छुप्या चलनवाढीला आळा घालण्यांत आला ही या काळांतील उल्लेखनीय गोष्ट आहे. बाहेरच्या गोष्टींखेरीज सरकारचें आर्थिक धोरणाहि बाहेरील परिस्थितीचा लाभ घेणें शक्य होण्यास कारणीभूत झालें आहे.

नियोजनाच्या या पहिल्या दोन वर्षांत एकूण ५८५ कोटी रुपये खर्चीं पडले. म्हणजे, येत्या तीन वर्षांत अद्यापि ७० टक्के खर्च व्हावयाचा आहे. या काळांत राज्य–सरकारांना मध्य सरकारनें ७१·७ कोटी रुपये साह्य केलें.

#### प्रगति

दोन वर्षांतील निरनिराळ्या क्षेत्रांत केलेल्या प्रगतींपैकी कांहीं थोड्या क्षेत्रांतील प्रगति पुढील तक्त्यांत दर्शविली आहे.

| | |
|---|---|
| मोठ्या योजनांमुळें पाटबंधाऱ्याखाली आलेलें जादा क्षेत्र | १४·२ लक्ष एकर |
| जादा वीज–उत्पादन | ३,१५,००० कि. वॅटस |
| शेतकी पिकांच्या उत्पादनांतील वाढ (१९५१–५२) | |
| ताग | १४ लक्ष गांसड्या |
| कापूस | ३९ „ „ |
| ऊंस | ३ लक्ष टन |
| अन्नधान्यें | ११·५ „ „ |
| शेतीखालील क्षेत्रांत वाढ (१९५२–५३ खरीप अन्नधान्यें) | ६० लक्ष एकर |
| आगगाड्यांचीं तयार इंजिनें (चित्तरंजन कारखाना) | ५८ |
| तयार केलेले रेल्वे डबे (५१–५२) | ६४३ |
| तयार केलेल्या रेल्वे वाघिणी (एप्रिल ५१–डिसें. ५२) | ८,००० |
| विजगापट्टम येथील गोदींत बांधलेल्या बोटी | ६ |
| नवे रस्ते (राष्ट्रीय राजमार्ग व मोक्याचे रस्ते) | ३८० मैल |
| चालू रस्त्यांची दुरुस्ती | १,०५० मैल |
| नवे पूल | १७ |

#### उत्पादनास प्रारंभ झालेले महत्त्वाचे सरकारी उद्योगधंदे

सिंद्री खत–कारखाना, चित्तरंजन आगगाड्यांच्या इंजिनांचा कारखाना, इंडियन टेलिफोन फॅक्टरी, इंडियन रेअर अर्थ्स लि., अलिपूरची नवी टांकसाळ, मशीन टूल मोटोटाइप कारखाना, अंबरनाथचा कारखाना.

#### पुढील उद्योगधंद्यांतील उत्पादनांत वाढ दिसून आली

कापड, सिमेंट, लोखंड व पोलाद, कागद व पुठे, शिवणाचीं यंत्रें, सायकली, रेयॉन व तागी माल.

#### हातीं घेतलेले नवीन कार्यक्रम

ऑक्टोबर १९५२ मध्यें ५५ समाजविकास कार्यक्रम, १,२०,००० खेडीं व्यापणाऱ्या शेती-विस्तार-संघटनेची योजना तयार केली.

#### शेतकीचें उत्पादन

अन्न व शेतीखात्यानें केलेल्या हंगामी अंदाजावरून १९५१–५२ मध्यें अन्नधान्यांच्या उत्पादनांत ८·८ लक्ष टनांची वाढ झाली असल्याचें दिसतें. तसेंच पाण्याखाली भिजूं लागलेल्या ८ लक्ष अधिक एकर जमिनींत सुमारें २·७ लक्ष टन अधिक धान्योत्पादन झालें असल्याचा अंदाज आहे.

याखेरीज बरींच छोट्या पाटबंधाऱ्यांचीं कामें, नालिकाकूप, ४·१४ लक्ष एकर पडीत जमिनींची नांगरट, तुकडे जोड व शेतकऱ्यांना शेती–कामासाठी अधिक कर्जे या गोष्टींचा या क्षेत्रांत समावेश होतो.

#### पाटबंधारे व वीज–योजना

नियोजनांत समाविष्ट केलेल्या पाटबंधारे व वीज–योजनांची प्रगति समाधानकारक आहे. पहिल्या दोन वर्षांच्या २०६ कोटी रु. या ठरलेल्या खर्चापैकी १९५२–५३ अखेर १९० कोटी रुपये खर्चीं पडले. मोठ्या योजनांमुळें १४·२ लक्ष एकर अधिक क्षेत्र पाण्याखाली भिजूं लागलें. विजेच्या बाबतींत २,३९,००० कि. वॅ. हें लक्ष्य ठेवलेलें होतें, पण प्रत्यक्षांत ३,१५,००० कि. वॅ. वीज उत्पादन होऊं लागलें आहे.

#### औद्योगिक विकास

खाजगी व सरकारी क्षेत्रांत उद्योगधंद्यांचे बाबतींत बरीच प्रगति झाली आहे. सरकारी क्षेत्रांत सिंद्री खत–कारखाना, चित्तरंजन कारखाना, टेलिफोन कारखाना, नवी टांकसाळ, अंबरनाथचा कारखाना इत्यादींचें उत्पादन सुरू झालें. खाजगी क्षेत्रांतहि १९५१ च्या प्रारंभांतच बऱ्याच कारखान्यांचें उत्पादन सुरू झालें होतें.

इंजिनियरिंग गटांतील मध्यम प्रमाणावरील बरेच कारखाने पुरे झाले व चालू कारखान्यांनींहि नवीन नवीन वस्तु, तसेंच उत्पादनाच्या नव्या मर्यादा गांठल्या. मोठ्या योजनांमध्यें पोलाद कारखान्यांच्या लोखंड व पोलाद उत्पादनांत वाढ, या गोष्टी येतात.

मात्र, एप्रिल ते डिसेंबर १९५२ या काळांत ॲल्युमिनियम, पंप, डिझेल इंजिनें, मशीन टूल्स, माग, कंदील, इत्यादि कांहीं धंद्यांत उत्पादनांत घट झाली आहे. मोठ्या प्रमाणावरील आयातीमुळें झालेल्या सांठ्यामुळें कांहीं धंद्यांत ही परिस्थिति आली.

आरोग्य, शिक्षण, मागासलेल्या जातींची सुधारणा, कामगार, घरबांधणी, पुनर्वसाहत या सामाजिक कार्यक्षेत्रांतहि कमी-अधिक प्रगति झाली आहे.

---

**मुंबई भावनगर रेल्वे रस्ता**—मुंबई ते भावनगर रेल्वेरस्त्याची पहाणी करण्यासाठी सौराष्ट्र सरकारनें ५ जणांची एक कमिटी नेमली आहे. ह्या संकल्पित रस्त्यामुळें खंबायतच्या आखातावरील तारापूर ह्या ठिकाणाशीं भावनगरचा संबंध जोडण्यांत येईल. रेल्वे रस्ता तयार करण्यासाठी सुमारें ३ कोटी, ३० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. रस्ता तयार झाल्यास मुंबई ते भावनगर हा प्रवास करण्यास १२ तास कमी लागतील आणि सौराष्ट्रांत येणाऱ्या कोळशावरील वहातुकीचा खर्च ५० टक्क्यांनीं कमी होईल.

## शास्त्री अवार्डवर बँक्स असोसिएशनचें निवेदन

### वेतनचा व राष्ट्रीय उत्पन्नाचा मेळ पाहिजे


शास्त्री अवार्ड प्रसिद्ध झाल्यापासून, तो त्याज्य ठरविण्याचा व सेन अवार्डला उचलून धरण्याचा बँकांचे नोकर व त्यांच्या युनियन्स ह्यांचा एकसारखा प्रयत्न चालू आहे. तथापि, बँकांच्या चालकांनीं मौन धारण केलें होतें; शक्य तों सार्वजनिक चर्चा टाळण्याची बँकिंगची प्रथा पाळणें हाच त्यांत उद्देश होता. परंतु, नोकरवर्गाची टीका रास्त आहे असा ह्या मौनाचा अर्थ जनता व सरकार करण्याचा संभव असल्यानें इंडियन बँक्स असोसिएशननें आतां आपलें निवेदन प्रसिद्ध केलें आहे.

"सेन अवार्डनें बँक-नोकरांना पगार-भत्ते व इतर फायदे देवविले, ते बँकांच्या ताकदीबाहेरचे होते. तशाच प्रकारचें काम करणाऱ्या सरकारी खात्यांतील, निम-सरकारी संस्थांतील व व्यापारी कंपन्यांतील नोकरांना मिळणाऱ्या पगार-भत्त्यापेक्षा ते कितीतरी जास्त होते. सेन अवार्ड अंमलांत राहिलें असतें, तर त्यामुळें बँकिंगची प्रगति व वाढ खुंटली असती. सेन अवार्ड-मधील कित्येक बाबींवर अपील करणें बँकांना आवश्यक झालें असतें; परंतु १९५० च्या लेबर अपेलेट ट्रायब्युनल कायद्याच्या एका खास कलमामुळें, अवार्डवर अपिल करण्यास बँकांना मोकळीकच नव्हती. सुप्रीम कोर्टाकडे प्रकरण न्यावें लागलें आणि त्यानें अधिकाराबाहेर अवार्ड केल्याचें ठरवून तें रद्द ठरविलें.

"शास्त्री अवार्डमधीलहि कित्येक बाबी बँकांना पसंत नाहींत व त्यावर अपील करणें त्यांना रास्त वाटलें असतें. परंतु त्यांनीं अवार्ड मान्य करण्याचें ठरविलें आहे. फक्त दोन-तीन बाबीं-पुरतेंच अपील त्या करणार आहेत.

"सरकार आणि जनता ह्या दोघांनींहि, श्री. टंडण ह्यांनीं अवार्डला भिन्नमतपत्रिका जोडली आहे, त्यांत दिग्दर्शित केलेल्या गोष्टींचा नीट विचार करणें इष्ट आहे. १९५१ हें वर्ष बँकांना नफ्याच्या दृष्टीनें अत्यंत भरभराटीचें गेलें, तरी सुद्धां ४६२ बँकांपैकी फक्त १९१ बँका डिव्हिडंड वाटूं शकल्या. १९५१ च्या मानानें १९५२ मध्यें कित्येक बँकांचे नफे बरेच कमी झाले. इंडियन बँक्स असोसिएशनच्या सभासदांपैकी १८ बँकांचा एकूण नफा १९५१च्या मानानें १९५२ मध्यें ५४ लक्ष रुपये कमी भरला. ह्यावरून, नफ्याचें प्रमाण उतरत असल्याचें दिसून येतें. इनव्हेस्टमेंटच्या बाजारभावानें होणाऱ्या किंमतींतील घसाऱ्याची पूर्ण तरतूद करणें कित्येक बँकांना शक्य झालेलें नाहीं. बँकांच्या नफ्यांतील उतार चालू राहिला, तर ज्या आतांपर्यंत डिव्हिडंड देऊं शकल्या नाहींत, त्या पुढेंहि देऊं शकणार नाहींत आणि ज्या कांहीं बँका डिव्हिडंड देत आहेत त्यांना लवकरच तें कमी करावें लागेल. असें झालें तर बँकांना वाढत्या प्रमाणावर लागणारें भांडवल मिळणें कठीण जाईल व त्यामुळें देशाच्या आर्थिक प्रगतीस अडचण येईल.

"बँकांच्या नोकरवर्गास वाढवून दिलेल्या मोबदल्यामुळें एस्टॅब्लिशमेंट खर्च भरमसाट वाढत आहे. त्यामुळें नफे घटत आहेत. नफे कमी होण्याचें दुसरें एक कारण म्हणजे बँकांना ठेवींवर ज्यास्त दरानें व्याज द्यावें लागत आहे. बँकांनीं गिऱ्हाइकांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर वाढविला आहे, परंतु तो आणखी वाढवितां येण्याजोगा नाहीं. कारण, ज्यास्त व्याज देण्याची त्यांची शक्ति मर्यादित आहे आणि शिवाय त्याचा परिणाम व्यापार-उद्योगावर प्रतिकूल होण्याचा संभव आहे. बँकेच्या नोकरवर्गाला किती पगार द्यावा हें ठरवितांना तो देणें बँकांना कितपत शक्य होईल हें पाहिलें पाहिजे. एस्टॅब्लिशमेंट खर्चाची चढती कमान बँकांना असह्य होत चालली आहे, ह्याचा पुरावा म्हणजे कित्येक बँकांनीं गेल्या तीन-चार वर्षांत कितीतरी शाखा बंद केल्या आहेत आणि आणखी कांहीं शाखा कमी करण्याची शास्त्री ट्रायब्यूनलकडे परवानगी मागितली आहे. शास्त्री अवार्डनें बँक नोकरांना देवविलेला मोबदला सरकारी व निमसरकारी नोकरांना मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा कितीतरी जास्त आहे; त्याचप्रमाणें सर्वच नोकरांना जो मोबदला मिळावयाचा, तो देण्याचा राष्ट्रीय शक्तीवरच अवलंबून ठेवला पाहिजे. राष्ट्रिय उत्पन्न किंवा उत्पादनशक्ति ह्यांच्याशीं त्याचा मेळ घातला पाहिजे."



### बेळगांव बँकेची स्वतःची इमारत

(आमचे बातमीदाराकडून)

बेळगांव बँकेची इमारत बांधून पूर्ण झाली असून, साफसफाईचा शेवटचा हात होत आला आहे. ही इमारत तीन मजली असून, शिवाय तळघर निराळें असें आहे. इमारत ऐन बाजार-पेठेंत असून, ती दक्षिणाभिमुखी आहे. तळघरामध्यें, जड जोखमीचे दागदागिने व जिनसा ठेवणेकरितां पांच पोलादी कपाटें आहेत. तीनशें एकावन्न लोकांना आपले जिन्नस यांत ठेवतां येतील. हीं पोलादी कपाटें, प्रसिद्ध गोदरेज कंपनीकडून मागवून घेतलीं असून, उंच भागांतील सामान काढण्यास त्रास होऊं नये, एवढ्याकरितां एक प्लाटफार्महि कंपनीनें दिला आहे. दरवाज्याचें काम भक्कम असून तें उघडण्याकरितां चार ठिकाणीं किल्ल्या लावाव्या लागतात. हें तळघर लोकांचे सोयीकरितां सकाळीं व संध्याकाळीं उघडें ठेवणेचा चालकांचा विचार आहे. तळमजल्यावर बेळगांव शाखेचा व्यवहार, दुसरे मजल्यावर मुख्य कचेरी व तिसरे मजल्यावर सभागृह अशी व्यवस्था होणार आहे. शाखेचा पैसा ठेवणेकरितां निराळी अशी तळघरांतच मागील बाजूस सोय आहे. या बँकेच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ, भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांच्या हस्तें करविण्याचा चालकांचा विचार आहे. नवीन इमारतींत आपल्या कामाची व्यवस्था नीट लावणेकरितां, मॅनेजर श्री. कुलकर्णी हे सतत लक्ष देत आहेत.

**निझामाचे ट्रस्ट**—हैदराबाद राज्याचा प्रमुख निझाम ह्यानें आपल्या आप्तांच्या व निकटच्या आश्रितांच्या मदतीसाठी एकूण ३० ट्रस्ट निर्माण केले आहेत. त्या सर्व ट्रस्टची रक्कम सुमारें ३५ लाख १२ हजार रु. आहे, असें अधिकृत रीत्या समजतें.

**चंबळ नदीवरील धरण**—मध्यभारतांतील चंबळ नदीवर एक धरण बांधण्यांत यावयाचें असून त्यासाठी ५ कोटी रुपये खर्च होणार आहेत. ह्या रकमेपैकी १ कोटींपेक्षा अधिक रक्कम छोट्या बचतीचीं सर्टिफिकेटस् विकून उभी करण्यांत आली आहे, असें समजतें.

## पांच मोठ्या बँकांचे तुलनात्मक आकडे

देणें व जिंदगी ( कोटी रु. )

| देणें | इंपीरिअल | | सेंट्रल | | बँक ऑफ इंडिया | | युनायटेड कमर्शिअल | | बरोडा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९५२ | १९५१ | १९५२ | १९५१ | १९५२ | १९५१ | १९५२ | १९५१ | १९५२ | १९५१ |
| मुदती ठेवी | ३७ | ३६ | ३५ | ३४ | ९ | ९ | १० | ११ | १४ | १४ |
| सेव्हिंग्ज ठेवी | २९ | ३० | २७ | २७ | ९ | ९ | ३ | ३ | ५ | ६ |
| करंट व इतर खातीं | १४१ | १६४ | ६१ | ६४ | ३८ | ४० | १८ | १६ | १० | ११ |
| एकूण ठेवी | २०६ | २३१ | १२३ | १२५ | ५६ | ५८ | ३१ | ३० | २९ | ३१ |
| **जिंदगी** | | | | | | | | | | |
| रोख | २२ | २० | १४ | १५ | ८ | ५ | ३ | ३ | ४ | ३ |
| इनुव्हेस्टमेंट | ९७ | ८५ | ६२ | ६४ | २० | १५ | १५ | १२ | ११ | ११ |
| कर्जें | ११२ | १४० | ५५ | ६१ | ३२ | ४२ | १४ | १८ | १५ | १९ |
| ठेवींशीं प्रमाण% | | | | | | | | | | |
| रोखीचें | १०.५ | ८.६ | ११.३ | १२ | १४.२ | ८.६ | ९.६ | १० | १३.८ | ९.६ |
| इनुव्हेस्टमेंटचें | ४७ | ३६.८ | ५०.४ | ५१.२ | ३५.७ | २५.८ | ४८.४ | ४० | ३७.९ | ३५.४ |
| कर्जाचें | ५४.२ | ६०.६ | ४४.७ | ४८.८ | ५७.१ | ७२.४ | ४५.१ | ६० | ५१.७ | ६१.३ |

उत्पन्न, खर्च आणि नफा ( लक्ष रु. )

| | इंपीरिअल | | सेंट्रल | | बँक ऑफ इंडिया | | युनायटेड कमर्शिअल | | बरोडा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९५२ | १९५१ | १९५२ | १९५१ | १९५२ | १९५१ | १९५२ | १९५१ | १९५२ | १९५१ |
| व्याज-डिस्कौंटचें उत्पन्न | ५५२ | ५४९ | ४२१ | ४०३ | १७६ | १५१ | १०७ | १०५ | १०८ | ९८ |
| ठेवी-कर्जेंवर दिलेलें व्याज | १७० | १२९ | १४२ | १२४ | ४६ | ३३ | ४९ | ३८ | ४६ | ३२ |
| पगार, अलावन्सेस, प्राव्हिडंट फंड | ३६९ | ३५२ | २२४ | २१० | ७० | ६० | ६१ | ५५ | ३९ | ३७ |
| नफा | १३३ | १३० | १०१ | १२५ | ७७ | ८० | २५ | ३५ | २५ | २८ |
| डिव्हिडंड ( % ) | १६ | १६ | १४ | १४ | १४ | १४ | ४ | ४ | १०+२ | १०+२ |

**एअर-इंडिआचें नवें विमान**—एअर इंडिआ कंपनीनें मुंबई-कराची मार्गावर स्काय-मास्टर जातीचें ४ एंजिनांचें नवें विमान सुरू करण्याचें ठरविलें आहे. अशा प्रकारचें विमान ह्या मार्गावर प्रथमच सुरू करण्यांत येत आहे. विमान मुंबई-कराची मार्गावर आठवड्यांतून ५ खेपा करील.

**माकडांच्या निर्यातीचा फायदा**—१९४९-५२ ह्या कालखंडांत भारतानें माकडांची परदेशीं निर्यात करून ९.४९ लाख रुपये किंमतीची परदेशीय हुंडणावळ मिळविली. हिंदमधील माकडांची निर्यात संशोधनासाठीं मुख्यतः अमेरिकेला करण्यांत येते व तीमुळें भारताला डॉलर्स मिळतात.

**अंदमानमधील वसाहत**—त्रावणकोर-कोचीन राज्यांतील जीं कुटुंबें अंदमानांत वसाहत करण्यासाठीं जातील, त्यांना पुढील प्रमाणें आर्थिक साह्य मिळणार आहे. प्रत्येक कुटुंबाला १० एकर जमीन, अन्नधान्य व वैद्यकीय मदत देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याशिवाय कुटुंबांतील जीं माणसें जंगलांत काम करण्यास जातील त्यांना रोज दोन रुपये मजुरीहि मिळणार आहे.

**श्री. लक्ष्मेश्वर ह्यांचें निधन**—कर्नाटकांतील सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते रावसाहेब फकिरप्पा म्हाप्पा लक्ष्मेश्वर हे कुर्तकोटी येथील त्यांच्या घरीं वयाच्या ६६ व्या वर्षी १८ मे रोजीं मृत्यु पावले. कणगीमहाल शेतकी पतपेढी त्यांनीं १९०५ सालीं नोंदविली होती. गदग ॲग्रि. प्रो. मार्केट सोसायटीचे ते प्रारंभींपासून अध्यक्ष होते. धारवाड जिल्ह्यांतील बऱ्याच सहकारी संस्थांच्या स्थापनेस त्यांनीं हातभार लावला होता. मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटच्या एक्झिक्यूटिव्ह कमिटीचे ते सभासद होते, त्याचप्रमाणें प्रां. सहकारी बँकेचे १९३१ ते १९३६ डायरेक्टर होते. कर्नाटक सें. को. बँकेचेहि ते अनेक वर्षें डायरेक्टर होते.

**"टेस्ट ऑफिसर"**—कोणाच्याहि मंत्र्याच्या मुद्दां कचेरींत शिरून तेथील कामाचा उठाव तपासण्याचा अधिकार असलेल्या एका "टेस्ट ऑफिसर"ची नेमणूक प. पंजाब (पाकिस्तान) सरकार करणार आहे, अशी घोषणा त्याचे मुख्य मंत्री, मलिक फेरोझखान नून ह्यांनीं नुकतीच केली. सचोटी व कार्यक्षमता ह्याबद्दल ख्याती असलेल्या एका उच्च दर्जाच्या अधिकाऱ्याकडे हें काम दिलें जाईल.

## ब्रह्मचारी नागरिकांवर कर

आधुनिक अगर प्राचीन काळचें कोठलेंहि राज्य घेतलें तरी राज्यकारभार चालविण्यासाठी कर बसवावेच लागतात असें दिसून येतें. ब्रह्मचारी लोकांवर कर बसवावा अशी सूचना पुष्कळदा करण्यांत येते. ह्याविषयींसंबंधीं ब्रिटनमधील ' वीकली मेल ' ह्या नियतकालिकांत जार्ज मेल नांवाच्या लेखकानें कांहीं मनोरंजक माहिती दिली आहे. मि. जॉर्ज मेल म्हणतात कीं, १६९५ सालीं तिसरा विल्यम ह्याला पैशाची टंचाई भासूं लागली तेव्हां त्यानें असा हुकूम काढला, कीं अविवाहित राहणाऱ्या २५ वर्षांपुढील कामगारानें दरवर्षी १ शिलिंग, इतर सभ्य गृहस्थांनीं ६ शिलिंग आणि ड्यूक लोकांनीं १२ पौंड, ११ शिलिंग ह्याप्रमाणें कर द्यावा. हा कर पांच वर्षेपर्यंत अमलांत होता. पण तो चुकविण्यांत लोकांनीं बरेंच कसब दाखविल्यामुळें पांच वर्षांत फक्त २,६०,००० पौंडच काय ते गोळा झाले. त्यानंतर कराची वसुली इतकी कमी झाली कीं १७०६ सालीं तो रद्दच करण्यांत आला. कर उभारण्याची ही कल्पना अमेरिकेंतील मेरीलँड कलोनिअल ॲसेंब्लीनें अनुसरली. ज्या ब्रह्मचाऱ्यांजवळ ३०० डॉलर्स असतील व जे ३० वर्षें वयाचे असतील त्यांच्यावर सालीना ५ शिलिंग कर बसविण्यांत आला होता. नंतर कराची व्याप्ति वाढवून विनापत्य विधुरांवरहि तो बसविण्यांत आला. कॅनडामध्यें विवाहाला उत्तेजन म्हणून नवऱ्यांना करांच्या बाबतींत अधिक सूट देण्यांत येत असे आणि ब्रह्मचारी नागरिकांवर व्यापाराच्या व प्रवासाच्या बाबतींत बंधनें घातलीं जात असत.

अमेरिकेंतील इलिनॉइस संस्थानांतील आरोरा गांवीं रहाणाऱ्या ब्रह्मचाऱ्यांवर गेल्या वर्षी मोठीच आपत्ति कोसळली. गांवांतील वयस्कर अविवाहित स्त्रियांनीं एके दिवशीं पोलिसांचें काम आपणाकडे घेतलें. त्यांच्यापैकीं २०० स्त्रियांनीं पोलिसांचे पोशाख घालून गांवांतील सर्व ब्रह्मचाऱ्यांना पकडले आणि त्यांच्याकडून दरडोई ६ डॉलरचा दंड वसूल केला. ज्यांच्याजवळ दंडापुरती रकम नव्हती. त्यांना गांवाच्या इस्पितळांत नेऊन रक्तदान करण्यास भाग पाडण्यांत आलें. तथापि प्राचीन काळांतील स्पार्टामधील ब्रह्मचाऱ्यांचे हाल मात्र वर्णनातीत आहेत. स्पार्टा राज्यांतील युवती दरवर्षी सांघिक कवाईत करीत असत. कवाईत पहाण्यास ब्रह्मचाऱ्यांना बंदी असे. नंतर त्या दिवशीं त्यांना बेताचे कपडे घालून गांवच्या बाजारांत नेत. तेथें त्यांची कवाईत मुलींकडून करवून घेत. त्यावेळीं स्वतः मस्करी करणारीं गीतेंहि त्यांना म्हणावीं लागत.

वयस्कर अविवाहित स्त्रिया पण कराच्या कक्षेंतून पूर्णतया सुटतात असें नाहीं. १९४९ मध्यें अलास्काच्या प्रतिनिधीगृहानें अविवाहित स्त्रियांवर कर बसविणारें एक बिल आणलें. अशा कायद्यामुळें विवाहाला व मातृपदाला उत्तेजन मिळेल आणि घरांचा तुटवडा कमी होईल अशी बिलामागील कल्पना होती. ह्या बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें नाहीं. पण पुढील वर्षी डेनमार्कच्या अर्थमंत्र्यांनीं त्याहि बिलाच्या पुढें मजल मारली. ज्या ब्रह्मचाऱ्यांना व अविवाहित स्त्रियांना तसेंच रहावयाचें असेल व त्यांचें उत्पन्न १००० पौंडांपर्यंत असेल तर त्यांनीं प्राप्तीवरील करांत २ टक्के अधिक आणि १,५०० पौंडांपर्यंत असेल तर ४ टक्के अधिक कर द्यावा अशी सूचना त्यांनीं केली. कांहीं दिवसांपूर्वी हंगेरिअन पार्लमेंटनें ब्रह्मचारी, अविवाहित स्त्रिया आणि विनापत्य जोडपीं ह्यांच्यावर कर बसविल्याचें जाहीर केलें आहे. भारतांत असा कांहीं कर बसविण्याचें सरकारनें मनावर घेतलें तर तो तीनपेक्षा अधिक मुलें असणाऱ्या जोडप्यांवर बसविण्यांत यावा अशी सूचना करणें अयोग्य होणार नाहीं.

### कांहीं गिरण्यांचें उत्पादन

( लक्ष रुपये )

| गिरणी | १९५१ | १९५२ |
|---|---|---|
| स्वदेशी | ३,१६ | ३,२२ |
| विष्णू | २,४१ | २,३८ |
| श्री अंबिका | ३,४६ | ३,०८ |
| कोहिनूर | ७,८७ | ७,०९ |
| स्वान | २,८६ | ३,०४ |
| गोल्डमोहोर | २,४३ | २,१५ |
| बंगलोर वूलन | ४,३२ | ४,५० |
| न्यूसिटी ऑफ बॉबे | १,७३ | १,४९ |
| बाकिंगहॅम अँड कर्नाटक | ८,८६ | ८,३३ |
| फिनिक्स | २,३३ | १,८७ |
| लक्ष्मी | २,४५ | २,३४ |
| ससुंन | २,७२ | २,८५ |
| न्यू युनियन | १,७९ | १,९६ |
| पोद्दार | १,५७ | १,३४ |
| टाटा | ३,२२ | २,७४ |
| स्टँडर्ड | २,९९ | ३,०६ |
| सेंचरी | ७,३७ | ७,२५ |
| डॉन | १,०७ | ७४ |
| बॉबे डाईंग | ६,९३ | ६,७१ |
| म्हैसूर स्पिनिंग | १,२४ | १,५५ |
| एकूण | ७०,७८ | ६७,६९ |

**टेलिफोनवर निक्का समारंभ**— लंडन येथील एक मुसलमान मुलाचा विवाह रावळपिंडी येथील मुलीशीं टेलिफोनवर ता. १९ रोजीं लावण्यांत आला. फोनवर निक्का म्हणण्यांत आला.

**कॅनरा बँकेची मरकारा येथें स्वतःची इमारत**—कॅनरा बँकिंग कॉर्पोरेशनच्या मरकारा ( कूर्ग ) येथील स्वतःच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ १६ मे रोजीं चीफ कमिशनर कर्नल बेदी ह्यांच्या हस्तें झाला.

**मि. ट्रिग्वेली ह्यांना पेन्शन**—युनायटेड नेशन्सचे सेक्रेटरी जनरल म्हणून ७ वर्षे काम केलेले मि. ट्रिग्वेली ह्यांना दरसाल १० हजार डॉलर पेन्शन मिळणार आहे.

**ब्रह्मदेशाला डॉक्टर्स हवेत**—गेल्या वर्षी ब्रह्मदेशाला २७५ डॉक्टर्स हवे होते, ते मिळविण्याची त्या सरकारनें भारतांत खटपट केली. परंतु फक्त ११० च डॉक्टर्स मिळाले. आतां जपानमधून १०० डॉक्टर्स व २५ दंतवैद्य आणण्यांत येणार आहेत. उभय सरकारांत ह्याबाबत वाटाघाटी चालू आहेत.

**उ. प्रदेश सरकारचे "पाणी महाराज" सल्लागार**—उत्तर प्रदेश सरकारनें पाण्याच्या विहिरींच्या जागा निश्चित करण्यासाठी पाणीवाला महाराजांचा सल्ला घेण्याचें ठरविलें आहे. पंडित ज्ञानप्रकाश, केसरी हे ते पाणीमहाराज होत. ते पूर्वी इंदूरच्या महाराजांच्या पदरीं कामावर होते.

**घर बांधण्यासाठी सहकारी कर्जाची मर्यादा**—ज्यांची मासिक प्राप्ति २०० रु. पेक्षा ज्यास्त नाहीं, अशांनाच फक्त सहकारी हौसिंग सोसायट्यांमार्फत घरबांधणीसाठीं कर्ज मिळूं शकेल, असें मद्रास सरकारनें जाहीर केलें आहे. कोणत्याहि एका घरास ३,००० रु. पेक्षा अधिक कर्ज मिळणार नाहीं.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.